


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६३६. वा | रविवार दि. २४ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# खळबळजनक घटना बुलढाणा स्त्री रुग्णालयातील सुप्रसिद्ध डॉक्टर सचिन वासेकर ४८ हजारांची लाच घेतांना एसीबीच्या जाळ्यात...

## डॉक्टर वासे...यांच्यांवर एसीबीने लाच घेतांना टाकले फासे...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयच्या स्त्री रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन वासेकर यांना बुलढाणा येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ४८ हजार रुपयांची लाच घेतांना रंगेहात पकडले.एक कंत्राटी डॉक्टरकडून ४८ हजार घेतांना त्याला पकडण्यात आले.धाड नाक्यावर सापळा रचून ही कारवाई करण्यात आली आहे. डॉ. वासेकर यांनी कोव्हिडं १९ (कोरोना) काळात उल्लेखनीय काम केले होते. त्यांना यासाठी पुरस्कृत देखील देण्यात आले होते. त्यांना लाच घेतांना पकडल्यामुळे अनेकांना धक्का बसला आहे.एसीबी ने दिलेल्या माहितीनुसार यातील तक्रारदार जिल्हा स्त्री रूग्णालयात कंत्राटी तत्वावर डॉक्टर आहेत.तक्रारदार डॉक्टरांना ३ महिन्याचे असे एकूण पगाराचे ६ लाख प्राप्त झाले होते.मात्र जिल्हा स्त्री रूग्णालयाचा लाचखोर वैद्यकीय अधीक्षक डॉ सचिन वासेकर या डॉक्टराने ड्युटीवर लावल्याचा मोबदला म्हणून ६ लाखाचे ८ टक्के असे ४८ हजार रूपये मागत होता. तक्रारदार डॉक्टर यांनी याप्रकरणी बुलढाणा एसीबीकडे तक्रार दिली. एसीबीने तक्रारीची खात्री करण्यासाठी आधी पडताळणी कारवाई केली.त्यात वासेकर याने लाच मागितल्याची खात्री झाल्यानंतर धाड नाक्यावर सापळा रचण्यात आला. त्यात डॉक्टरकडून लाचखोर सचिन वासेकर ४८ हजार घेतांना रंगेहाथ पकडला गेला.त्याच्या विरूध्द बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि धडाकेबाज कारवाई पोलिस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र श्री मारूती जगताप, अप्पर पोलिस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती श्री






देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधिक्षक श्रीमती शितल घोगरे, एएसआय शाम भांगे, पोहेकॉ विलास साखरे, प्रविण बैरागी,मो.रिजवान,राजू क्षीरसागर, पोना विनोद लोखंडे, जगदीश पवार,पोकॉ गौरव खत्री, शैलश सोनवणे,मपोकॉ स्वाती वाणी,चापोकॉ अर्शद खान ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केली आहे.शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक१०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे.


# शेंदुर्जन येथील प्रेमी युगल प्रकरणातील मुलाच्या वडिलांची गळफास घेऊन आत्महत्या...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील शेंदुजन येथील ४, दिवसापूर्वी पळून गेलेल्या प्रेमी युगलाने साखरखेर्डा शिवारात खंडोबाच्या माळाकडे लिंबाच्या झाडाला एकमेकांना आलिंगन देऊन गळफास घेत आत्महत्या केली विशेष म्हणजे यातील प्रेमिका ही १३ वर्षाची आठवीत शिकणारी अल्पवयीन असून मुलगा २४ वर्षाचा आहे दोघांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून त्यांनी आत्महत्या केल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे याबाबत मिळालेली माहिती अशी की शेंदुर्जन येथील गोपाल समाधान खिल्लारे वय २४ वर्ष आणि गा-वातीलच मुलगी १३ वर्षाची ८ व्या वर्गात शिकणारीअल्पवयीन मुलगी यांचे प्रेम संबंध जुळले दोघेही एका समाजाचे असल्याने मुलगी तब्येत खराब झाल्यास सांगून घरी राहिली तर मुलीच्या आई वडील कामाला गेल्याने ही अल्पवयीन मुलगी मुलाच्या घरी राहायला गेली त्यांच्या घरी दोन दिवस राहील्यानंतर घरचा लग्नाला विरोध झाला त्यामुळे काही नातलंगांनी समजावून सांगितले मात्र विरोध होत असल्याचे बघून हे प्रेम युग घरातून पळून गेले याप्रकरणी साखरखेर्डा पोलिसात मुलगी पळून दिल्याप्रकरणी गोपाल वर गुन्हा दाखल झाला होता तेव्हा-पासून पोलीस त्यांचा शोध घेत होते मात्र समाजात बदनामी होईल या भीतीपोटी दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती



दिनांक २२ ला त्यांनी साखरखेर्डा शिवारात गुंजमाथा परिसरात असलेल्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली हि माहिती मुलाचे वडील समाधान नारायण खिलारे यांनी सुद्धा साखरखेर्डा परिसर गुंज भागाकडे स्वतःची जीवन यंत्र संपवली आहे त्यामुळे शेंदुर्जन परिसरामध्ये आणखीनच शेक कळा पसरली आहे



# जिल्हा नर्सेस असोशिएशनची कार्यकारिणी गठीत...

## जिल्हाध्यक्ष जयश्री वाघ तर जिल्हाउपाध्यक्ष सपना म्हस्के यांची बिनविरोध निवड

**जनसंचलन/ बुलढाणा**



जिल्हा नर्सेस असोसिएशनची नविन कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी जयश्री वाघ तर जिल्हा उपाध्यक्षपदी सपना अनिल म्हस्के यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. महाराष्ट्र शासकीय नर्सेस फेडरेशनच्या राज्याध्यक्षा इंदुमती थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकार्याध्यक्ष वर्षा पागोटे व जिल्हा रुग्णालयाच्या सहाय्यक अधिसेविका कुरुसिंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शासकीय परिचारिका महाविद्यालय बुलढाणाच्या प्राचार्या उज्वला खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा जिल्ह्यातील परिचारिकांची संघटना बांधणी संदर्भात महत्त्वाची बैठक १५ डिसेंबर रोजी जिल्हा रुग्णालयात पार पडली. प्रारंभी राज्य कार्याध्यक्षा वर्षा पागोटे यांनी संघटनेची स्थापना, उद्देश, संघर्ष, आंदोलने, नियमावली व पुढील वाटचाल यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. त्यानंतर उपस्थित सभासदांमधून संघटनेच्या जिल्हा कार्यकारणीची एकमताने निवड करण्यात आली. त्यानुसार जिल्हा कार्याध्यक्षपदी जयश्री वाघ तर जिल्हा उपाध्यक्षपदी सपना अनिल म्हस्के यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी मंगेश शिरसाट, सचिवपदी संदीप अढाव, सहसचिव रॉबर्ट खंडारे व सोमानाथ खंडाळकर, कार्याध्यक्ष शीतल मोगल, माधुरी मोरे, प्राजक साबळे, सुजाता राजपूत, कोषाध्यक्ष प्रशांत थोरात, सहकोषाध्यक्ष सरला देशमुख, सुनंदा फुसे, संपर्क प्रमुख अमित किन्हीकर, मालती करोडपती, जिल्हा संघटक शुभदा पावडे, पौर्णिमा जाधव, सपना काकडे, अरुण नागरगोजे, रंजना मुंडे, प्रमुख सल्लागार मीना निकम, उज्वला खेडेकर यांचा समावेश आहे. या निवडीनंतर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील सर्व परिचारिकांच्या सर्वांगीण विकासासाठी व परिचारिकांच्या समस्या तसेच कर्तव्यावर येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी संघटना एकजूटपणे काम करणार आहे. संघटना अधिक बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व परिचारिकांनी सहकार्य करावे आणि संघटनेत सहभागी व्हावे, असे आवाहन नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष, जिल्हाउपाध्यक्ष व कार्यकारिणीने केले आहे.

# वीज वितरण कर्मचाऱ्यांच्या वतीने आमदार संजय गायकवाड यांचा सत्कार...

**जनसंचलन/बुलढाणा**



लाईनमन हा मात्र विविध समस्यांच्या अंधारात असून, लाईनमन स्टाफ बचाव कृती समितीने केलेल्या आंदोलनाची दखल घेवून त्यांच्या मागण्या तात्काळ सोडविण्यासंदर्भात आ. संजय गायकवाड यांनी अधिवेशनात आवज उठविला.त्यामुळे लाईनमन स्टाफ बचाव कृती समितीच्या वतीने आज दि २३ डिसेंबर रोजी बुलढाणा विधानसभेचे आमदार संजय गायकवाड यांचा त्यांच्या जनसंपर्क कार्यालय मातोश्री येथे पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आहे.
मंगळवार १९ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्याच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आ. संजय गायकवाड यांनी सभागृहात लक्षवेधी दरम्यान बोलताना महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीपर्यंतचा कार्यकाळ पाहता तळागाळामध्ये कार्यरत असणारे लाईनस्टाफ कर्मचारी यांच्या ज्वलंत प्रश्नासंदर्भात शासन स्तरावर अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मानव संसाधन स्तरावर अनेक बैठका झाल्या आहेत. त्यांच्या न्यायहक्क मागण्यासंदर्भात कोणताही ठोस निर्णय न झाल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे लाईनस्टाफ बचाव कृती समिती यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान आंदोलनाच्या इश-ारा दिला होता आणि त्यांचे आंदोलन सुरू आहे, या कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये आतापर्यंत शास-नाने तातडीने निर्णय घ्यावा याकरिता शासनाने संबंधित मंत्री महोदयांना बचाव कृती समितीच्या मागण्या मान्य कराव्या ही महत्वपूर्ण मागणी याव-ेळी केली.हिवाळी अधिवेशनात सर्व आमदारांना निवेदन देण्यात आले होते.ह्या आमच्या मागण्या अधिवेशनात मांडा मात्र त्या कोणीच मांडल्या नाही मात्र बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड यांनी या मागण्या अधिवेशनात मांडल्या त्यामुळे आज कर्मचाऱ्यांच्या वतीने आज त्यांचा सत्कार करण्यात आले आहे.




# साकेगाव येथील विकास निकाळजे यांची बी.ए.सेफ पदी निवड...

**जनसंचलन/ चिखली**



साकेगाव येथील सामान्य कुटुंबातील विकास कडूबा निकाळजे या युवकाने उरात जिद्द बाळगून परिस्थितीची जाणीव ठेऊन अतिशय मेहनत घेऊन केंद्राच्या पद-ाला गवसणी घातली विकासचे बालपणीचे शिक्षण ७पर्यंत जि.प.शाळेत गावातच झाले पुढील शिक्षण १० पर्यंत गावातील शिव-ाजी विद्यालयात झाले. घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे आई वडिलांनी शेती मजुरी करून पुढील शिक्षण शिकवले.
विकास ने या आगोदर प्रयत्न केले होते त्याला यश न आल्याने विकास पुन्हा त्या जोशाने न खचाता त्याच जिद्दीने पुन्हा पेटून आपल्या आई वडिलांच्या कष्टाचे चीज करून आज त्याने मध्ये प्रवर्गामधून प्रथम येऊन गावचे तालुक्याचे नाव उंचावले असून सर्व क्षेत्रातून त्याचे कौतुक /अभिनंदन चा वर्षाव होत आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# मोताळ्यानंतर आता मलकापूर तालुक्यातही गांजाची शेतीचा थैमान...

## टाकलेल्या छाप्यात लाखोंचा गांजा जप्त, मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनची कारवाई....

जनसंचलन /मलकापूर

मलकापूर ग्रामीण पोलिसांनी तालुक्यातील हिंगणाकाझी शिवरात शुक्रवारी रात्री ९ वाजता धाड घातली. त्यात गट क्रमांक ५२ मधील सुभाष भागवत पाखरे त्याने अतिक्रमण केलेल्या शेतात गहू, कपाशी व तूर या पिकांसोबत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या गांजाची ७३ झाडे लावल्याची माहिती समोर आली सविस्तर वृत्त अशे की मलकापूर तालुक्यातील हिंगणाकाझी शिवारात मध्ये मलकापूर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला गट क्रमांक ५२ मधील शेतात गांजाची तब्बल ७३ झाडे लावण्यात आल्याचे आढळून आले त्या झाडांचे वजन १ क्विंटल ८५ किलो ७७ ग्रॅम इतके आहे. तर त्या पिकाची एकूण किंमत सुमारे १८ लाख ५७ हजार ७०० रुपये आहे.



शेतकरी बेकायदेशीरपणे गांजाची झाडे लावून संवर्धन व जोपासना करीत असल्याचे पोलिस कारवाईत आढळून आले. या घटनेत ग्रामीण पोलिसांनी सुभाष भागवत पाखरे रा. भालेगाव, ता. मलकापूर यांच्याविरुद्ध भादंविच्या कलम २० एनपीडीएस कायद्यान्वये शनिवारी पहाटे ३ वाजता गुन्हा दाखल केला. शेतकऱ्यास मुद्देमालासह गजाआड करण्यात आले. मलकापूर ग्रामीण पोलिस निरीक्षक संदीप काळे, उपनिरीक्षक प्रशांत राठोड, हे पुढील कारवाई करीत आहेत .

# शैक्षणिक संस्था मालकातील वाद विकोपाला वेळोवेळी धमकी देत मारहाण; ६ जणांवर गुन्हा...

जनसंचलन / खामगाव

इंग्रजी माध्यमाच्या शैक्षणिक संस्था चालविणाऱ्या दोन मालकांमध्ये वाद होऊन हा वाद चांगलाच विकोपाला गेला आहे. एकाने दुसऱ्याला तू तुझी शाळा बंद का करीत नाही या कारणावरून वेळोवेळी धमक्या देत मारहाण केली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलिसांनी ६ जणांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. स्थानिक आईसाहेब मंगल कार्यालय केशवनगर या भागात राहणारे कविश्वर सिंह कन्हैया सिंह राजपूत यांची घाटपुरी नाका परिसरात आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज आहे. तर त्यांच्या कॉलेजच्या बाजूला महेश जनार्दन भारसाकडे व नरेश जनार्दन भारसाकडे यांची किड्स किंगडम या नावाने शाळा आहे. आदर्श ज्ञानपीठमध्ये विद्यार्थी प्रवेश घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याच कारणावरून वेळोवेळी भारसाकडे व राजपूत यांच्यात वाद होतात १९ सप्टेंबर रोजी या वादाची तक्रार राजपूत यांनी शिवाजीनगर पोस्टेला दिली होती. नरेश भारसाकडे व महेश भारसाकडे आणि त्यांची पत्नी ही आदर्श ज्ञानपीठ मधील विद्यार्थी व त्यांच्या पालकासोबत नेहमी वाद करीत असते. हे वाद का करता, असे समजावण्यासाठी



राजपूत हे भारसाकडे यांच्याकडे गेले असता त्यांच्यात परत वाद झाला. याबाबत २८ सप्टेंबर रोजी पोलीस अधिक्षक यांच्याकडे पालकांनी तक्रारही केली होती. तर २९ सप्टेंबर रोजी भवानी ट्रेडर्स समोर नरेश भारसाकडे याने रस्त्यात अडवून अश्लील शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर २ डिसेंबर रोजी सुध्दा शाळेसमोर माझा भाऊ आशिष ठाकुर याला भडकावून त्यानेही मला तू भारसाखडेच्या नादाला लागू नको तुझी शाळा बंद कर असे म्हणून धमकी दिली होती. वेळोवेळी भारसाकडे यांच्याकडून धमक्या व मारहाणीच्या घटना घडत आहेत. १ एप्रिल रोजी याच कारणावरून माझा भाऊ आशिष ठाकूर यांनीही लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तर १३ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास महाकाल चौकात अनोळखी दोघांनी मला नरूभाऊ सांगते तसे कर शाळा बंद कर असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याबाबत कविश्वर सिंह राजपूत यांनी दिलेल्या तक्रारीत सर्व नमूद केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी महेश जनार्दन भारतसाकडे, नरेश जनार्धन भारसाकडे, कांचन महेश भारसाकडे, आशिष प्रेम सिंह ठाकूर सर्व रा. भट्टड लेआउट व अधिक दोन अनोळखी अशा जणांविरुध्द शिवाजीनगर पोलिसांनी कलम ३४१, २९४, ३२३, ५०६ , ३४ भादंविचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डोणगावात आज शेतकरी शेतमजूर मेळावा

## वन बुलढाणा मिशन व महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

वन बुलढाणा मिशन आणि महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर रोजी मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे शेतकरी शेतमजूर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा परिषद शाळेसमोरील आठवडी बाजार मैदानावर दुपारी दोन वाजता हा कार्यक्रम होणार आहे. वन बुलढाणा मिशनचे संकल्पक तथा राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके व महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेचे प्रमुख दिलीप गायकवाड प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. भूमिहीन, शेतमजूर, कामगार, अपंग, निराधार यांचे प्रश्न मांडणारा हा हक्काचा मेळावा असणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




# पत्रकार राऊत यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

जनसंचलन /मेहकर

.सामाजिक जाणभाण व पत्रकारीतेतील भरीव योगदानाबद्दल , सकस लेखणीचे धनी ,पत्रकार कैलास हरिभाऊ राऊत यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२३ जाहीर झाला आहे. मातोश्री वत्सलाबाई बहुउद्देशीय संस्था साखरखेर्डा, महाराष्ट्र सारथी व दर्पण चौफेरच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

देऊळगाव माळी तालुका मेहकर येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते, संपादक कैलास राऊत सामाजिक क्षेत्रातील मोठे नाव मानले जाते. गेल्या १८ वर्षांपासून त्याची पत्र सेवा सुरु आहे. मेहकर तालुख्यासह जिल्ह्याच्या प्रश्नावर ते सातत्यपूर्ण लिखाण करीत आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यंदाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, मानाचा फेटा देऊन साखरखेर्डा येथे ३० डिसेंबर २०२३ रोजी सदर



पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

तरुणाई फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम कैलास राऊत यांनी राबविले आहे. गोरगरिबांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होऊन अनेकांना मदतीचा हात त्यांनी दिला आहे. ते विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी असून त्यांनी केलेल्या निस्वार्थ सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना आतापर्यंत महाराष्ट्र व राज्या बाहेरील ९० पेक्षा जास्त पुरस्काराने सन्मानित केले आहे . बुलढाणा जिल्ह्यातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत देखण्या पुरस्कार सोहळ्याचे वितरण होणार आहे.

# आळंद येथे चोरट्यांनी केली सव्वापाच लाखाची चोरी...

जनसंचलन/ देऊळगाव राजा

तालुक्यातील आळंद येथे अज्ञात चोरट्यांनी घराचे चे कुलूप तोडून लोखंडी कपाटातून रोख ९० हजार रुपयांसह सोन्याचे दागिने असा एकूण ५ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. आळंद येथील खाडे कुटुंब कापूस वेचण्यासाठी शेतात गेले असता चोरट्यांनी दिवसा घरफोडी केली.



प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील आळंद येथील संतोष सखाराम खाडे यांचे कुटुंब शेतात कापूस वेचण्यासाठी गेले होते. दरम्यान कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला व घरातील एकूण ५ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्यात कोरोनाचा नवा व्हेरिएंट,आरोग्य यंत्रणांची काय काय तयारी?

**वृत्तसंस्था/ ठाणे**

देशात आणि राज्यात सध्या जेएन-वन हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. यापार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आरोग्य यंत्रणा तसेच जिल्हाधिकारी यांची बैठक घेतली. राज्यभरातील आरोग्य संस्थांचे स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीक आणि फायर ऑडीट करण्यात यावे. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये विलगीकरण आणि ऑक्सिजन बेडस् यांची यंत्रणा सज्ज ठेवावी. नागरिकांनी घाबरून न जाता कोरोना प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करावे, राज्यभरातील यंत्रणा सज्ज असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून ही बैठक घेतली. त्यामध्ये आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर संबंधित विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.ऑक्सिजन प्लांट्स, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन पाईपलाईन्स, आरटीपीसीआर लॅब, डयुरा/लिक्विड ऑक्सिजन प्लांट या सर्व बाबी सुस्थितीत आहेत का याची तपासणी करावी व योग्य पद्धतीने ते कार्यान्वित आहेत की नाही याची खात्री करतानाच लसीकरणाचा आढावा घ्यावा, ज्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांची माहिती घ्यावी व लसीकरण करण्याच्या दृष्टीने तयारी ठेवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. लस व औषध साठा पुरेसा उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी. आरोग्य यंत्रणेने टास्क फोर्सची स्थापना करुन त्यातील तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी कोविड सेंटर, विलगीकरण बेड्स, आयसीयू बेड्स, व्हेंटिलेटर बेड्स च्या सद्य:स्थितीबाबतचीही माहिती यावेळी घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशाने याआधी देखील कोविडच्या संकटाचा धीरोदात्तपणे यशस्वी मुकाबला केला आहे. संपूर्ण जगाने त्याबाबतीत आपल्या देशाचे अनुकरण केले. मागील अनुभवाच्या आधारे आताही राज्यातील यंत्रणा संपूर्णपणे सज्ज आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी. आगामी सण व नववर्षाचे स्वागत या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्क् वापरावा. आपल्यामुळे इतरांना संसर्ग होणार यासाठी काळजी घेण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी नागरिकांना केले. सोशल मीडियावरून तसेच प्रसारमाध्यमांनी देखील या नव्या व्हेरिएंट संदर्भात चुकीच्या बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घेणे जेणेकरून लोकांमध्ये संभ्रम वा घबराट निर्माण होणार नाही, अफवा पसरणार नाही. माहिती प्रसारित करताना अधिकृत माहितीचाच उपयोग करावा, यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. शासन यंत्रणा एकजुटीने कोणत्याही परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी पूर्णत: सज्ज आहे. यंत्रसामुग्री, औषध साठा, इतर साधनसामुग्री मुबलक प्रमाणात उपलब्ध् आहे. त्यामुळे जनतेने घाबरु नये. काळजी घ्यावी काळजी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्रीमुश्रीफ, आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी आरोग्ययंत्रणेच्या सज्जतेबाबत माहिती दिली. आरोग्य यंत्रणेच्या सर्व यंत्रसामुग्री, इतर सर्व यंत्रणा योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याची खात्री करण्यासाठी दि. १५ ते १७ डिसेंबर २०२३ या कालावधीत ठिकठिकाणी मॉक ड्रिल घेतल्याचे त्यांनी सांगितले. सध्या राज्यात ६३ हजार विलगीकरण बेड्स, ३३ हजार ऑक्सिजन बेड्स, ९ हजार ५०० आयसीयू बेड्स व सहा हजार व्हेंटिलेटर बेड्स उपलब्ध आहेत. सध्या राज्यात कोरोनाचे ४५ रुग्ण (मुंबई २७, पुणे-८, ठाणे-८,कोल्हापूर-१ रायगड-१) आढळून आले आहेत, असे म्हैसकर यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी जेएन वन या नव्या व्हेरिएंटबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येईल, असे सांगितले.

## मनोज जरांगे यांची छगन भुजबळांवर टीका, २० जानेवारीपासून आमरण उपोषण...

**वृत्तसंस्था/ बीड**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची बीडमध्ये इशारा सभा सुरु आहे. या सभेपूर्वी त्यांची विराट रॅली पार पडली. यानंतर बीडच्या सभेला संबोधित करताना मनोज जरांगे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि राज्य सरकारवर हल्लाबोल केला. मनोज जरांगे यांनी भुजबळ यांचा येवल्याचा येडपट असा उल्लेख केला. शांत असलेल्या मराठ्यांना डाग लागला असल्याचंही जरांगे म्हणाले. बीड जिल्ह्यातील मराठ्यांचा महाप्रलय जमला आहे. आपण विराट ताकदीनं जमला आहात त्यामुळं मराठा समाजाच्या चरणी नतमस्तक होतो, असं जरांगे म्हणाले. गोरगरीब मराठ्यांच्या लेकरांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी आलेल्या बांधवांना जय शिवराय म्हणत मनोज जरांगेंनी अभिवादन केली.मराठा समाजानं शांतता काय असते ते पुन्हा सिद्ध केलं आहे. आपल्याला डाग लावला गेलाय, शांततेनं आंदोलन करणाऱ्या मराठ्यांना डाग लावला आहे. कोणी म्हणतं आमची घरं जाळलं,



आमचं हॉटेल जाळलं पण तुम्हीच तुमची हॉटेल जाळली आणि निष्पाप मराठ्यांना गुतवल्याचा आरोप मनोज जरांगेंनी केला. आपल्या पोरांनी काय न करताही गुन्हे लावले गेले. निष्पाप पोरांना गुतवण्याचं काम सरकारनं केलं आहे. मराठ्यांनी शांतता रॅली काढली होती. सरकारनं झोपू नये, मराठ्यांना राज्यात शांतता हवी आहे. मराठा समाज शांततेत मैदानात आला आहे, विनाकारण त्याला डाग लावू नका, असं मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांचेच सरकार ऐकत असल्याचा दावा केला. भुजबळ मराठ्यांच्या वाटाला कशाला जातात, असा सवाल मनोज जरांगेंनी केला. मी लई नमुना बेक्कार असल्याचं जरांगेंनी म्हटलं. गिरीश महाजन यांनी तुम्ही काही बोलू नका छगन भुजबळ यांना समज दिली असल्याचं सांगितल्याचं मनोज जरांगे म्हणाले. छगन भुजबळ यांना मराठा आरक्षण मिळाल्यानं कचका दाखवतो. भुजबळ यांच्यात किती दम आहे हे बघायचे आहे, असं जरांगे म्हणाले. मराठ्यांच्या आरक्षणाच्या विरोधात कोण बोलला तर त्यांना सुट्टी देणार नाही. मराठा आरक्षणासाठी संघर्ष सुरु असल्याचं जरांगेंनी म्हटलं. मनोज जरांगे यांनी २० जानेवारीला मुंबईत आमरण उपोषण करणार असल्याची घोषणा केली.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जण ठार तर एक जण गंभीर...

**जनसंचलन/मोताळा**

अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवार २२ डिसेंबरच्या संध्याकाळी तळणी ते दाभाडी मार्गावर घडली. शेख रशीद शेख कालु व शेख अमीन शेख हनिफ (दोघे रा. माकोडी ) अशी या अपघातामधील मृतकांची नावे आहेत. मोताळा तालुक्यातील माकोडी येथील शेख रशीद शेख कालु, शेख अमीन शेख हनिफ व शेख सलीम शेख कालु हे तिघे जण एका दुचाकीद्वारे (क्रमांक एमएच-२८- बीएम-२१७३) या वाहनाने मलकापूरहुन माकोडी येथे घराकडे जात होते. दरम्यान, तळणी - दाभाडी मार्गावरील खडकपूर्वा परिसरात अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात शेख रशीद शेख कालु यांचा जागीच मृत्यु झाला तर, शेख अमीन शेख हनिफ व शेख सलीम शेख कालु हे दोघे जण गंभीर जखमी झाले. जखमींना तत्काळ उपचारासाठी मलकापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.




मात्र शेख अमीन शेख हनिफ यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमी शेख सलीम शेख कालु यांच्यावर उपचार सुरू आहेत. एका चारचाकी वाहनाने या दुचाकीला धडक दिली, अशी चर्चा घटनास्थळी होती. अपघाताची माहिती मिळताच बोराखेडी पोलीस स्टेशनचे पीएसआय विजयकुमार घुले, पीएसआय अनिल भुसारी, पोलिस कॉन्स्टेबल सुनील थोरात, रामदास गायकवाड व सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल करण्यासोबतचमार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या अपघातात दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने माकोडी गावसह परिसरात शोककळा पसरली आहे. रुग्णालयासह घटनास्थळी नागरिकांची एकच गर्दी उसळली होती. वृत्त लिहेपर्यंत बोराखेडी पोलिसांची कार्यवाही सुरू होती.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | Rates | Hight | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/- 15 Day=3500/- 7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Rate | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T & C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com